प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

एप्रिल 06, 2016

**दि पनीहाटी सहकारी बँक लि., जिल्हा - 24 - परगणा (एन) पश्चिम बंगाल ह्यांना आरबीआयकडून दंड आकारणी**

बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) च्या कलम 46 (4) सह वाचित, कलम 47अ(1)(ब) मधील तरतुदींखाली तिला दिल्या गेलेल्या अधिकाराचा वापर करुन भारतीय रिझर्व बँकेने, दि पनीहाटी सहकारी बँक लि., जिल्हा - 24 परगाणा (एन). पश्चिम बंगाल रु.2.00 लाख (रुपये दोन लाख) दंड लावला आहे व तो दंड, एप्रिल 16, 2014 च्या आदेशातील सूचनांचे उल्लंघन केल्याने आणि तुमचा ग्राहक ओळखाचे निकष/अँटी मनी लॉडरिंग उपाय/वित्तीय दहशतवादाचा सामना करणे/प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉडरिंग अधिनियम (पीएमएलए), 2002, ह्यावरील महापरिपत्रक दि. जुलै 1, 2015 मधील सूचनांचे उल्लंघन करण्यात आल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस दिली होती व त्यावर वरील बँकेने उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य गोष्टी व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँक अशा निर्णयाप्रत आली की उल्लंघन झाल्याचे सिध्द झाले असून दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2015-2016/2360**